## प्रेसनोट दि. १०/०९/२०१८

# महाराष्ट्र पोलीस दलातर्फे नाशिक येथे झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत पुणे शहर पोलीस दलातील पोलीस कर्मचारी सचिन शिंदे याने पटकविला पहिला क्रमांक

दि.०७/०९/२०१८ रोजी महाराष्ट्र पोलीस दलातर्फे नाशिक येथे झालेल्या महाराष्ट्र पोलीस शरीरसौष्ठव स्पर्धेत सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर कडील **पोलीस नाईक सचिन शिंदे** यांनी ६५ ते ७० वजनीगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावुन पुणे शहर पोलीस दलाचे नावलौकिक केले आहे. त्यामुळे सचिन शिंदे यांची राजस्थान, जयपुर येथे होणा-या राष्ट्रीय पोलीस स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

सचिन शिंदे यांनी या अगोदर सन २००२ ते २००४ दरम्यान पुणेश्री गोल्ड मध्ये प्रथम क्रमांक पटकविला आहे. तसेचसन २००३ ते २००४ चे दरम्यान खालसा युनिवर्सीटी पंजाब, ज्युनिअर मिस्टर इंडिया, सिल्व्हर पुणे, मिस्टर इंडिया सहभाग, जालंधर पंजाब येथे सहभाग घेतलेला आहे. तसेच सन २०१४ मध्ये महाराष्ट्र श्री नाशिक येथे झालेल्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकविला आहे.

सचिन शिंदे हे पुणे शहर पोलीस दलात सन २००५ साली भरती झाले असून ते पोलीस खात्याचे काम सांभाळून मिळालेल्या वेळेमध्ये आपले शरीरयष्टी मजबूत तयार करून त्यांनी पुणे शहर पोलीस दलाचे नांव उज्वल केले आहे.

सदरच्या केलेल्या कामगिरीबद्दल श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर, श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर, श्री.समीर शेख, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे -१, पुणे शहर, श्री.भानुप्रताप बर्गे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पुणे शहर, सौ.मनिषा झेंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.